मंडल आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना
<u>शासकीय व निमशासकीय सेवेत आरक्षण.</u>

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-1093/2167/सीआर-141/93/16-ब,
मंत्रालय, मुंबई-400 032. दिनांक: 23 मार्च, 1994.

**वाचा**- (1) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:बीसीसी-1064/111/जे, दिनांक:9-4-1965.
(2) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:बीसीसी-1091/2551/(ड)/16-ब, दिनांक:27-3-1991.

**प्रस्तावना :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-1064/111/जे, दिनांक: 9 एप्रिल, 1965 अन्वये शासकीय, निमशासकीय सेवेत खालीलप्रमाणे आरक्षण विहित करण्यात आले आहे :-

| | | |
|---|---|---|
| (1) | अनुसूचित जाती व अनुसूचित जातीतील बौध्द धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती. | 13% |
| (2) | अनुसूचित जमाती | 7% |
| (3) | विमुक्त जाती व भटक्या जमाती | 4% |
| (4) | इतर मागासवर्ग (ओ.बी.सी.) | 10% |
| | एकूण :- | 34% |

2. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-1092/1692/प्र.क्र.154/16-ब, दिनांक : 4 ऑगस्ट, 1992 अन्वये धनगर व बंजारी समाजाचा विमुक्त जाती व भटक्या जमातीमध्ये अंतर्भाव केल्यानंतर विमुक्त जाती व भटक्या जमातीचे पूर्वी असलेले 4 टक्के आरक्षण 2 टक्क्यांनी वाढवून ते 6 टक्के विहित करण्यात आलेले आहे.

3. दिनांक: 27 मार्च,1991 च्या आदेश क्र. बीसीसी-1091/2551/(क)16-ब, अन्वये मागासवर्गीयांच्या तीन प्रवर्गातील (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व विमुक्त जाती व भटक्या जमाती) उमेदवार उपलब्ध नसल्यास ही पदे अदलाबदलीने भरण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

## शासन निर्णय

मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना शासकीय, निमशासकीय तसेच मंडळे, महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, सहकारी बँका, शासकीय उपक्रम व शैक्षणिक संस्था इत्यादी यांच्या सेवेमध्ये वाढीव आरक्षण ठेवण्याबाबतचा प्रस्ताव त्याचप्रमाणे विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीत वाढ करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या प्रस्तावाचा सर्वकष विचार करुन शासनाने आता इतर मागासवर्गीयांकरिता तसेच विमुक्त-जाती व भटक्या जमातींकरिता खालीलप्रमाणे सुधारित आरक्षण विहित करण्याचा निर्णय घेतला आहे.

| | | |
|---|---|---|
| (अ) | विमुक्त जाती (14 व तत्सम जाती) | 3% |
| (ब) | भटक्या जमाती (जानेवारी 1990 पूर्वीच्या 28 व तत्सम जमाती) | 2.5% |
| (क) | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती यादी जोडल्याप्रमाणे) | 3.5% |

(ड) भटक्या जमाती
(वंजारी व तत्सम जमाती यादी जोडल्याप्रमाणे) 2%
(इ) इतर मागासवर्गीयांकरिता 19%

-----------------

एकूण: 30%

2. विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच इतर मागासवर्गीयांकरिता शासन निर्णय क्र.बीसीसी-1092/1692/प्र.क्र.154/16-ब, दि.4-8-1992 व क्र. बीसीसी-1064/111/जे, दि.9-4-1965 अन्वये विहित करण्यात आलेल्या आरक्षणात आता शासन निर्णयाच्या वरील परि.1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गाकरिता विहित करण्यात आलेल्या आरक्षणातील पदे भरली न गेल्यास ती भरली न गेलेली पदे सरळ सेवा भरतीकरिता 5 भरती वर्षापर्यंत अनुशेष म्हणून पुढे ओढण्याची तरतूद होती व ही पदे भरण्याकरिता सतत 5 भरती वर्षापर्यन्त प्रयत्न करणे अपेक्षित आहे. तथापि, अशा आशायाची तरतूद इतर मागासवर्गीयांकरिता पूर्वी जे 10% आरक्षण विहित करण्यात आले होते त्याकरिता करण्यात आलेले नव्हते. इतर मागासवर्गीयांची आरक्षित पदे ती त्या त्याच वर्षी भरणे आवश्यक होते. तथापि, शासनाने या बाबींचाही विचार करुन आता असा निर्णय घेतला आहे की, यापुढे सरळ सेवा भरतीतील इतर मागासवर्गीयांकरिता आरक्षित असलेली पदे भरली न गेल्यास ती अनुशेष म्हणून पुढे ओढण्यात यावीत व 5 भरती वर्षापर्यन्त ही पदे त्याच प्रवर्गातील उमेदवारांमधून भरण्यात यावीत. प्रयत्न करुनही या प्रवर्गाकडून उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर ती अदलाबदलीने भरणेबाबत शासन निर्णय, क्रमांकः बीसीसी-1091/2551/(क)/16-ब, दिनांक 27 मार्च,1991 च्या तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

3. शासन निर्णयाच्या परि.1 मध्ये उल्लेखिलेले आरक्षण हे शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता देखील अनुज्ञेय आहे. शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये इत्यादी विभागांनी याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करावेत. शैक्षणिक संस्थामध्ये एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास ते आरक्षण अनुशेष म्हणून पुढे ओढण्यात येत नसल्यामुळे व ते त्याच वर्षी भरावयाचे असल्यामुळे ते अदलाबदलीने भरणेबाबत संबंधित विभागाने विचार करुन योग्य ते आदेश निर्गमित करावे.

4. मंडल आयोगाच्या शिफारशींनुसार "क्रीमी लेयर" चे तत्व केंद्र शासनाने मान्य केले आहे. राज्य शासनाने देखील "क्रीमी लेयर" चे तत्व थोडया फार फरकाने मान्य केले आहे. तेव्हा "क्रीमी लेयर" बाबत व त्यानुषंगाने इतर बाबींचा विचार करुन योग्य ते सविस्तर आदेश समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागाकडून निर्गमित करण्यात येतील. शासन निर्णयाच्या परिच्छेद एक मधील अ, ब, क, ड, इ या प्रवर्गातील फक्त क, ड, इ करीताच क्रीमी लेयरचे तत्व लागू राहील.

5. गुणवत्तेनुसार जे उमेदवार सेवा प्रवेशाकरिता पात्र ठरले जातील त्यांची गणना आरक्षित पदांवर केली जाणार नाही.

6. शासन निर्णयाच्या वरील परि.1 येथील अ, ब, क, ड, इ येथील आरक्षण फक्त सरळ सेवा भरतीकरिता अनुज्ञेय राहील. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार यापूर्वी तात्पुरत्या स्वरुपात किंवा कायम स्वरुपात ज्या पदोन्नत्या दिलेल्या आहेत त्यावर याचा परिणाम होणार नाही. ज्या ज्या ठिकाणी सेवेमध्ये पदोन्नती करिता आरक्षण ठेवण्यात आलेले आहे हे आरक्षण सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या दिनांकापासून ( 16 नोव्हेंबर 1992 ) पुढे 5 वर्षे चालू राहील.

7. पूर्वी ज्या ज्या प्रयोजनाकरिता आरक्षणाचे आदेश लागू करण्यात आले होते त्या सर्व प्रयोजनाकरिता हे आरक्षणाचे आदेश लागू राहतील. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या विभागांतर्गत याप्रमाणे कार्यवाही करुन त्या विभागांनी स्वतंत्र आदेश निर्गमित करावेत.

8. हे आदेश या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

9. हे आदेश समाजकल्याण, शालेय शिक्षण, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांशी विचारविनिमय करुन निर्गमित करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

एस.शंकर मेनन
प्रधान सचिव (सेवा)

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
- प्रबंधक उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
- प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
- प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
सचिव, राज्य निवड मंडळ,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-1/2 (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र-1/2 (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
निवड नस्ती.

- पत्राने.

## भटक्या जमाती "क"

### धनगर व त्याच्या तत्सम जातींची यादी

धनगरः-(1) अहिर, (2) डांगे, (3) गटरी, (4) हंडे, (5) तेलवर, (6) हटकर, (7) हाटकर, (8) शेगर, (9) खुटेकर, (10) तेलंगी, (11) तेल्लारी, (12) कोकणी-धनगर, (13) कानडे, (14) व-हाडे-धनगर, (15) झाडे, (16) झेडे, (17) कुरमार, (18) माहुरे, (19) लाडसे, (20) सनगर, (21) धनवर.

(सीबीसी-1089/(203)/मावक-5, दिनांक: 25 मे, 1990 अन्वये )

## भटक्या जमाती "ड"

### वंजारी व तत्सम जातींची यादी

वंजार, वंजारा, वंजारी.

--- x --- x --- x ----